# सुपरबाईक बाजारपेठेत 'डीएसके बेनेली'चे आगमन




**'डीएसके बेनेली'च्या भागीदारीच्या घोषणा समारंभात (डावीकडून) बेनेली चे संचालक स्टेफानो मिशेलोटी, विक्री पश्चात सेवा विभागाचे स्टेफानो लोगो, डीएसके समूहाचे चेअरमन डी. एस. कुलकर्णी, डीएसके मोटोव्हीलचे चेअरमन शिरीष कुलकर्णी आणि बेनेलीचे संचालक फ्रँक झुआन्ग.**

**पुणे : प्रतिनिधी**

डीएसके मोटोव्हिल्स या देशातील सुपरबाईक उद्योगातील प्रस्थापित कंपनीने बेनेली या ख्यातनाम इटालियन मोटारसायकलिंग दिग्गज कंपनीशी आज भागीदारीची घोषणा एका खास समारंभात केली. देशात झपाट्याने वाढत असलेल्या सुपरबाईक क्षेत्रात त्यामुळे इटालियन सुपरबाईक्सची सर्वात मोठी श्रेणी बाईकप्रेमींना उपलब्ध होणार आहे.

डीएसके मोटोव्हिल्सचे अध्यक्ष शिरीष कुलकर्णी, डीएसके उद्योगसमूहाचे अध्यक्ष डी. एस. कुलकर्णी, प्रेसिडेंट हेमंती कुलकर्णी, तन्वी कुलकर्णी, बेनेली क्यूजे, एसआरएलचे मंडळ संचालक फ्रँक झुआन्ग इत्यादी या घोषणेच्या वेळी उपस्थित होते.

डीएसके मोटोव्हिल्स आणि ह्योसंग यांच्यात यापूर्वी करार झाला असला तरी 'डीएसके बेनेली'चे सर्व व्यवहार, वितरण यंत्रणा ही सर्वस्वी वेगळी असणार आहे. बेनेली ३०० सीसीपासून १६०० सीसीपर्यंतच्या ज्या सुपरबाईक बनवत आहेत, त्यांची जुळणी डीएसके मोटोव्हिल्सच्या सध्याच्या प्लँटमध्ये होईल. येत्या २ महिन्यांत या बाईक्स ग्राहकांना विक्रीसाठी उपलब्ध होतील.

या वेळी पत्रकारांशी बोलताना शिरीष कुलकर्णी म्हणाले, २० शहरांमध्ये वितरक नेमले जाणार आहेत. प्रथम मुंबई, पुणे, दिल्ली, हैद्राबाद, बंगळुरू, चंदिगड, कोलकत्ता येथे येत्या चार महिन्यांत वितरक नेमले जातील. भविष्यकाळात ५० सीसी पासूनच्या बाईकपासून १५०/२०० सीसीपर्यंतच्या बाईकच्या उत्पादनाची तयारी असल्याचेही ते म्हणाले.

भारताची सर्वात मोठी बाजारपेठ आमच्या दृष्टीने महत्त्वाची आहे, असे फ्रँक झुआन्ग यांनी स्पष्ट केले. ''भारतातील दुचाकी वाहनांची बाजारपेठ १० ते १२ टक्क्यांनी दरवर्षी वाढते. २०१६ पर्यंत ही २१ ते २३ दशलक्ष युनिटवर पोहोचणार आहे हे लक्षात घेऊन भारतीय बाजारपेठेत प्रदीर्घ काळ राहू इच्छितो''. डीएसके मोटोव्हिल्स ही भारतात वेगाने वाढणारी सुपरबाईक कंपनी असून, त्यांची आर्थिक ताकदही मोठी आहे. या भागीदारीमुळे योग्य उत्पादने, योग्य वेळी व योग्य किमतीत आणू, असेही ते म्हणाले.

१९११ मध्ये स्थापन झालेल्या बेनेली या कंपनीने इटली, जर्मनी, फ्रान्स, चीन, ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, स्पेन आदी ३० देशांत स्वत:चे अस्तित्व निर्माण केले असून, आता त्यांनी भारतात प्रवेश केला आहे.

या कंपनीने भारतातील रस्त्यावर दिसणाऱ्या अत्यंत खास इटालियन बाईक्सच्या सर्वात मोठ्या श्रेणीचे प्रदर्शन केले. त्यात स्पोर्टी लूक असलेली टोर्नेडो, नेकेड ट्रे किंवा टीएनटी सुपरबाईक्सचा समावेश आहे. त्यात इन लाईन, दोन सिलेंडर असलेली टीएनटी ३०२, इनलाईन फोर सिलेंडर ६०० सीसी टीएनटी ६००, टीएनटी ६०० जीटी, ८९८ सीसी, इनलाइन थ्री सिलेंडर टीएनटी ८९९, ११३१ सीसी, इनलाइन तीन सिलेंडरची टीएनटी ११३० आणि १५५ बीएचपी प्लस सुपरबाईकही आहे.